# प्रेसनोट

दिनांक– १४/११/२०१८.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जल व्यवस्थापन, अंबरनाथ येथील विभागीय लेखापाल यांना लाच स्विकारताना अटक

दिनांक १४/११/२०१८ रोजी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जल व्यवस्थापन, अंबरनाथ येथील विभागीय लेखापाल **शांतीकुमार बाबुराव पाटील**, वय ५७ वर्षे यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १४,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीप्रमाणे

यातील तक्रारदार यांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जल व्यवस्थापन अंबरनाथ या कार्यालयातील संगणकाचे दुरुस्ती व देखभालीचे बिल मंजुर केल्याबददल तसेच जमा असलेले सेक्युरीटी डिपॉझीट परत देण्यासाठी व भविष्यात संगणक देखभालीचे टेंडर पुन्हा देण्यासाठी वरील नमदु लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १६,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांनी लोकसेवक यांच्याशी तडजोड करून तडजोडीअंती १४,०००/– रुपये देण्याचे ठरले. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **शांतीकुमार बाबुराव पाटील** यांना तक्रारदार यांच्याकडून १४,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई–मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**